दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३२० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

**आजचे पंचांग**

दिनांक : १८ ऑगस्ट २०२६ वार : मंगळवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : षष्ठी तिथी (सायंकाळी ०५:५० पर्यंत) त्यानंतर सप्तमी तिथी नक्षत्र : स्वाती नक्षत्र (१९ ऑगस्ट सकाळी ०६:४६ पर्यंत) त्यानंतर विशाखा नक्षत्र योग : शुक्ल योग (१९ ऑगस्ट पहाटे ०३:२२ पर्यंत) त्यानंतर ब्रह्म योग करण : तैतुला करण (सायंकाळी ०५:५० पर्यंत) त्यानंतर गराजा करण

**तीस वर्षांपूर्वीचा रोप-वे पुन्हा पर्वतीच्या वाटेवर!**

**पुणे :** सुमारे तीन दशकांपूर्वी राजकीय विरोधामुळे खडलेला सारसबाग-पर्वती रोप-वेचा प्रकल्प आता नव्या स्वरूपात पुन्हा मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. पेशवे पार्क ते पर्वती देवस्थानाच्या मागील बाजूपर्यंत रोप-वे उभारण्याचा महापालिकेचा प्रस्ताव आहे. त्यासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली आहे. पर्वती टेकडी ही पुणेकरांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. दररोज सकाळी आणि संध्याकाळी हजारो नागरिक पर्वतीची पायवाट आणि पायऱ्या चढण्यासाठी येतात.

# गांधी हत्या प्रकरणातील गोडसे बंधू आरएसएसचे सक्रिय सदस्य होते; सावरकरांच्या नातवाची न्यायालयात साक्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

महात्मा गांधी यांच्या हत्येशी संबंधित ऐतिहासिक वादाला पुन्हा एकदा न्यायालयीन व्यासपीठावरून चर्चेचे स्वरूप मिळाले आहे. पुणे न्यायालयात सुरू असलेल्या एका फौजदारी मानहानीच्या खटल्यातील उलटतपासणीदरम्यान विनायक दामोदर सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांनी नथुराम गोडसे आणि गोपाळ गोडसे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (ठ्ड्ड) सक्रिय सदस्य होते, अशी साक्ष दिल्याचा दावा करण्यात आला आहे. या साक्षीमुळे गांधी हत्या प्रकरणातील गोडसे यांच्या तत्कालीन राजकीय-सामाजिक संबंधांवरून नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी अमोल श्रीराम शिंदे यांच्या न्यायालयात ही कार्यवाही सुरू आहे. सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधी यांच्या विरोधात दाखल केलेल्या मानहानीच्या दाव्याच्या संदर्भात त्यांची उलटतपासणी करण्यात आली. याच सुनावणीदरम्यान गोडसे बंधू आणि आरएसएसमधील संबंधांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

गोडसे बंधूंबाबत सावरकरांच्या नातवाची कबुली?

उलटतपासणीदरम्यान सात्यकी सावरकर यांनी आपल्या आईकडील वंशपरंपरेची माहिती देताना गोपाळ गोडसे हे आपले आजोबा असल्याचे सांगितले. तसेच नथुराम गोडसे हे गोपाळ गोडसे यांचे भाऊ असल्याची पुष्टी केली. त्यानंतर गांधी हत्येच्या आसपासच्या ऐतिहासिक काळात नथुराम गोडसे आणि गोपाळ गोडसे हे दोघेही आरएसएसचे सक्रिय सदस्य होते का, यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आले. त्यावर त्यांनी दोघेही सक्रिय सदस्य असल्याचे मान्य केल्याचा दावा करण्यात आला आहे.

या साक्षीचा संदर्भ केवळ एका व्यक्तीच्या राजकीय भूमिकेपुरता मर्यादित नसून गांधी हत्या प्रकरणाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीशी जोडला जात आहे. त्यामुळे न्यायालयातील या उलटतपासणीला राजकीय आणि ऐतिहासिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**मानहानीच्या खटल्याला ऐतिहासिक वळण**

राहुल गांधी यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या मानहानीच्या दाव्यातील आरोप-प्रत्यारोपांदरम्यान गोडसे, सावरकर आणि आरएसएस यांच्यातील ऐतिहासिक संबंधांचा मुद्दा केंद्रस्थानी आला आहे. न्यायालयीन प्रक्रियेत साक्षीदारांकडून नोंदवण्यात येणारी विधाने ही पुराव्याच्या परीक्षणाचा भाग असतात. त्यामुळे कोणत्याही एका साक्षीच्या आधारे अंतिम न्यायालयीन निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

मात्र, सावरकरांच्या कुटुंबाशी संबंधित व्यक्तीनेच गोडसे बंधूंच्या आरएसएस सदस्यत्वाबाबत न्यायालयात केलेले कथित विधान राजकीय वर्तुळात निश्चितच चर्चेचा विषय ठरले आहे. गांधी हत्या, नथुराम गोडसे, विनायक दामोदर सावरकर आणि आरएसएस यांच्यातील संबंधांचा इतिहास अनेक दशकांपासून राजकीय वादाचा केंद्रबिंदू राहिला आहे. आता पुणे न्यायालयातील उलटतपासणीमध्ये समोर आलेल्या या साक्षीमुळे त्या जुन्या वादाला पुन्हा एकदा न्यायालयीन संदर्भ मिळाला आहे. या प्रकरणातील पुढील सुनावणी आणि न्यायालयासमोर सादर होणारे पुरावे या दाव्याची कायदेशीर दिशा निश्चित करण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.

## मुख्यमंत्री ज्या भाषेला थांबवत नाहीत, तीच भाषा महाराष्ट्राची राजकीय संस्कृती बनतेय?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड : प्रतिनिधी**

महाराष्ट्राला यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे, आर. आर. पाटील यांच्यासारख्या नेत्यांनी केवळ राजकारण दिले नाही; त्यांनी राजकारण करण्याची एक सभ्य पद्धत दिली. मतभेद असू शकतात, संघर्षही होऊ शकतो; मात्र विरोधकाच्या कुटुंबावर, वैयक्तिक आयुष्यावर किंवा प्रतिष्ठेवर हल्ला करणे ही महाराष्ट्राची राजकीय परंपरा नव्हती. आज मात्र हाच सुसंस्कृतपणा कुठेतरी हरवल्याचे चित्र दिसत आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्या काळातील राजकीय संस्कृतीचा संदर्भ घेतला तर टीका कितीही जहरी असली तरी वैयक्तिक मर्यादा ओलांडल्यानंतर दिलगिरी व्यक्त करण्याची आणि ती स्वीकारण्याची मोठेपणाची परंपरा होती. आजच्या राजकारणात मात्र सोशल मीडिया, सभांमधील भाषणे आणि राजकीय आरोप-प्रत्यारोपांमध्ये व्यक्तीच्या कुटुंबापर्यंत पोहोचणे हीच जणू राजकीय रणनीती बनत आहे.

प्रश्न केवळ विरोधकांच्या वक्तव्यांचा नाही. प्रश्न आहे तो सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेचा. राज्याचा मुख्यमंत्री हा केवळ प्रशासनाचा प्रमुख नसतो; तो राज्याच्या राजकीय वातावरणावरही प्रभाव टाकतो. मंत्र्यांनी, आमदारांनी किंवा राजकीय कार्यकर्त्यांनी मर्यादा ओलांडल्या तर मुख्यमंत्री त्यांना थांबवणार आहेत की राजकीय सोयीसाठी मौन बाळगणार आहेत, हा खरा प्रश्न आहे.

आज महाराष्ट्रात राजकीय आरोपांचा स्तर अनेकदा धोरणांवरून वैयक्तिक आयुष्यापर्यंत घसरताना दिसतो. विरोधकांच्या कुटुंबीयांवर टीका, व्यक्तिगत संबंधांवर प्रश्नचिन्ह, महिलांविषयी अवमानकारक वक्तव्ये आणि समाजातील संवेदनशील घटकांबाबत उत्तेजक भाषा वापरण्याचे प्रकार गंभीर आहेत. मराठा आरक्षण असो किंवा ओबीसी आरक्षणाचा प्रश्नहे विषय आधीच सामाजिकदृष्ट्या संवेदनशील आहेत. अशा परिस्थितीत नेत्यांनी संयमाची भाषा वापरण्याऐवजी भावनांना चिथावणी देणारी भाषा वापरली तर त्याची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागू शकते.

मुख्यमंत्री म्हणून राज्याच्या राजकीय संस्कृतीची जबाबदारी सत्ताधाऱ्यांवर सर्वाधिक असते. विरोधकांनी मर्यादा ओलांडल्या तर त्यांच्यावरही टीका झाली पाहिजे; पण सत्तेच्या जवळ असलेल्या व्यक्तींनी मर्यादा ओलांडल्यास त्यांना रोखण्याची जबाबदारी आणखी मोठी आहे. 'माझ्या पक्षाचा माणूस आहे' म्हणून मौन आणि विरोधकांसाठी कठोर भूमिका, अशी दुहेरी मापदंडाची पद्धत महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला आणखी खालच्या पातळीवर नेईल.

राजकारणात मतभेद हवेत; कारण मतभेदातूनच लोकशाही मजबूत होते. पण मतभेदांचे रूपांतर वैरात आणि वैराचे रूपांतर कुटुंबांवरील चिखलफेकीत होऊ लागले तर लोकशाहीचा दर्जाच घसरतो. आजचा सर्वात मोठा प्रश्न असा आहेमहाराष्ट्रातील राजकारणी पुढच्या पिढीला कोणता वारसा देणार आहेत? यशवंतरावांचा संयम, वैचारिकता आणि सुसंस्कृत राजकीय संवाद की सोशल मीडियावरील ट्रोलिंग, अर्वाच्य भाषा आणि वैयक्तिक चिखलफेक? मुख्यमंत्र्यांनीच पुढाकार घेऊन राजकीय भाषेची लक्ष्मणरेषा आखली नाही, तर सरकार बदलतील; सत्ता बदलेल; चेहरे बदलतीलपण महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीची घसरण थांबणार नाही.

## राहुल गांधींवरील कथित बेहिशेबी मालमत्ता चौकशीला सर्वोच्च न्यायालयाचा 'ब्रेक'; सीबीआय, ईडीला अहवाल सादर करण्यास मनाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या कथित बेहिशेबी मालमत्तेप्रकरणी सीबीआय आणि ईडी चौकशीची मागणी करणाऱ्या याचिकेच्या सुनावणीला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्थगिती दिली. तसेच पुढील आदेशापर्यंत केंद्रीय तपास यंत्रणांनी या प्रकरणासंदर्भात अलाहाबाद उच्च न्यायालयात कोणताही पुढील अहवाल सादर करू नये, असे निर्देश दिले.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहन यांचा समावेश असलेल्या तीन सदस्यीय खंडपीठासमोर राहुल गांधी यांच्या अपिलावर सुनावणी झाली. राहुल गांधी यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

यापूर्वी मे महिन्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाने तक्रारीतील आरोपांची कायद्यानुसार पडताळणी करण्यास मुभा दिली होती. तसेच सीबीआय आणि ईडीला कायद्यानुसार योग्य ती कारवाई करण्याची मुभा असल्याचे नमूद केले होते.

राहुल गांधी यांच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिबल यांनी या प्रक्रियेवर तीव्र आक्षेप घेतला. ही कारवाई कायद्याला अज्ञात असून सूडबुद्धीने केली जात असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. तक्रारदाराच्या ओळखीबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

सीबीआयच्या वतीने ज्येष्ठ वकील एस. व्ही. राजू यांनी एजन्सीने सध्या केवळ तक्रारीची पडताळणी केली असून त्यापलीकडे कोणतीही कारवाई केलेली नसल्याचे सांगितले. आरोप खरे ठरल्यास ते गंभीर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत प्रथमदर्शनी गुन्ह्याचे पुरावे आढळल्यास पोलीस किंवा तपास यंत्रणा कायद्यानुसार गुन्हा दाखल करू शकतात, त्यासाठी संबंधित व्यक्तीची परवानगी आवश्यक नसल्याचे स्पष्ट केले. न्यायालयाने तक्रारदाराला राहुल गांधी यांच्या याचिकेशी संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले असून, पुढील सुनावणीत त्याची बाजूही ऐकली जाणार आहे. त्यामुळे या प्रकरणातील तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेची पुढील दिशा सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेवर अवलंबून राहणार आहे.

## ओबीसी आरक्षणाला मोठा धक्का? ५१२ सरपंचपदे खुल्या प्रवर्गात; १५ जिल्ह्यांसाठी सुधारित आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली/हैदराबाद : प्रतिनिधी**

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ओबीसी आरक्षणाबाबत राज्य सरकारने महत्त्वाचा बदल केला आहे. ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्याच्या राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर १५ जिल्ह्यांतील सरपंचपदांच्या आरक्षणात सुधारणा करण्यात आली आहे. या बदलामुळे ओबीसींसाठी आरक्षित असलेली ५१२ सरपंचपदे कमी होऊन ती खुल्या प्रवर्गात वर्ग करण्यात आली आहेत.

ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात दीर्घकाळ चर्चेत राहिल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू झाली. त्यानुसार नगरपंचायत, नगरपालिका, महापालिका, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायतींमध्ये ओबीसींसाठी २७ टक्के आरक्षण लागू करण्याची प्रक्रिया राबवण्यात आली. मात्र, अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसी आरक्षणाची एकत्रित मर्यादा काही ठिकाणी ५० टक्क्यांपेक्षा अधिक जात असल्याने निवडणूक आरक्षणाच्या गणितावर प्रश्न निर्माण झाला.

याच पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने ३० एप्रिल २०२६ रोजी ग्रामपंचायतींमधील एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्याचे निर्देश दिले. त्यानुसार ग्रामविकास विभागाने १५ जिल्ह्यांतील सरपंचपदांच्या आरक्षणाचा सुधारित आदेश काढला आहे.

**ओबीसीची ६,७१९ पदे**




**आता ६,२०७**

राज्य निवडणूक आयोगाच्या १३ जून २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार संबंधित १५ जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींमध्ये ओबीसींसाठी ६,७१९ सरपंचपदे आरक्षित होती. त्यापैकी ३,३७३ पदे महिलांसाठी राखीव होती.

सुधारित आरक्षणानुसार आता ओबीसींसाठी ६,२०७ सरपंचपदे आरक्षित राहणार आहेत. त्यातील ३,१११ पदे महिलांसाठी असतील. म्हणजेच ओबीसी आरक्षणातील ५१२ पदांची कपात झाली आहे.

या कपातीचा थेट फायदा खुल्या प्रवर्गाला झाला आहे. पूर्वी खुल्या प्रवर्गासाठी १३,०७७ सरपंचपदे होती. सुधारित आदेशानंतर ही संख्या वाढून १३,५८९ झाली आहे. त्यापैकी ६,८०३ पदे महिलांसाठी राखीव असतील.

**१५ जिल्ह्यांमध्ये बदल**

सुधारित आरक्षणाचा आदेश धुळे, जळगाव, हिंगोली, नांदेड, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि वर्धा या १५ जिल्ह्यांना लागू असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेची घोषणा केली असली तरी ओबीसींच्या स्वतंत्र जातनिहाय नोंदीबाबत अजूनही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अशा परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणाच्या मर्यादेवरून झालेला हा बदल राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचा ठरणार आहे.

एकीकडे ओबीसींच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न, तर दुसरीकडे ५० टक्के आरक्षणाची कायदेशीर मर्यादाया दोन्हींच्या कात्रीत ५१२ सरपंचपदे कमी झाली आहेत. त्यामुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकांपूर्वी या सुधारित आरक्षणाचा राजकीय परिणाम किती व्यापक होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**सारांश वृत्त**

### रवींद्र जडेजा कपिल देवनंतर 'असा' पराक्रम करणारा दुसराच भारतीय! जगातील चार दिग्गज ऑलराउंडरमध्ये एन्ट्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**गॉल : वृत्तसंस्था**

गॉलमध्ये श्रीलंका विरुद्ध भारत संघात सुरू असलेल्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात रवींद्र जडेजाने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. तो आता दिग्गज अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत सामील झाला आहे, त्याने असा विक्रम केला आहे, जो याआधी क्रिकेट इतिहासात केवळ तीन अष्टपैलू खेळाडूंना करता आला होता. या सामन्यात भारताचा डाव तिसऱ्या दिवसाच्या सुरुवातीला ४६२ धावांवर संपला. त्यामुळे श्रीलंका संघ पहिल्या डावात फलंदाजीला उतरला. मात्र, भारताच्या गोलंदाजांनी सुरुवातीलाच यजमान श्रीलंकेला मोठे धक्के दिले. त्यामुळे श्रीलंकेची अवस्था ५ बाद ९० धावा अशी झाली होती. यात जडेजाने श्रीलंकेचा कर्णधार धनंजय डी सिल्वाला २१ धावांवर माघारी धाडले होते.

पण त्यानंतर सोनल दिनुशा आणि निरोशान डिकवेल्ला यांनी श्रीलंकेचा डाव सावरताना भक्कम भागादारी केली. त्यांनी ६ व्या विकेटसाठी १४६ धावांची भागीदारी केली. अखेर प्रसिद्ध कृष्णाने डिकवेल्लाला ८० धावांवर बाद करत ही जोडी तोडली. त्यानंतर लगेचच जडेजाने केशरा नुवंथाला २ धावांवर शुभमन गिलच्या हातून झेलबाद केले. ही विकेट मात्र जडेजासाठी विक्रमी ठरली.

**जडेजा दिग्गजांच्या पंक्तीत**

जडेजासाठी नुवंथाची विकेट ही कसोटी कारकिर्दीतील ३५० वी विकेट ठरली. त्याने ९० व्या कसोटीत हा टप्पा पार केला आहे. त्याच्या नावावर कसोटीत ४००० हून अधिक धावाही आहेत. त्यामुळे तो कसोटीत ४००० हून अधिक धावा आणि ३५० किंवा त्यापेक्षा अधिक विकेट्स घेणारा जगातील चौथा, तर भारताचा केवळ दुसराच अष्टपैलू खेळाडू ठरला आहे.

## पुण्यात २२ ऑगस्टला 'विद्यार्थ्यांचा आवाज'; राहुल गांधींच्या कार्यक्रमातून तरुणाईच्या प्रश्नांना राजकीय धार!

## 'दिमागी नक्षल'चा सोशल मीडिया पलटवार; पंतप्रधानांच्या शब्दांनंतर २४ तासांत १.६ लाख फॉलोअर्स

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणातून 'दिमागी नक्षल' अर्थात 'बौद्धिक नक्षलवाद' हा शब्दप्रयोग केल्यानंतर त्याचे राजकीय पडसाद आता सोशल मीडियावर उमटू लागले आहेत. 'दिमागी नक्षल पार्टी' या नावाने तयार झालेल्या सोशल मीडिया अकाऊंटने अवघ्या २४ तासांत १.६ लाखांहून अधिक फॉलोअर्स मिळवल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे पंतप्रधानांच्या भाषणातील या शब्दप्रयोगाला सोशल मीडियातून मिळणाऱ्या प्रतिक्रियेने नवे वळण दिले आहे.

यापूर्वी 'कॉकरोचलह पार्टी' अर्थात 'उेलज्ञरोचलह गरपींर झरीं' या नावाने झालेल्या सोशल मीडिया चर्चेनंतर आता 'दिमागी नक्षल पार्टी'चा ट्रेंड चर्चेत आला आहे. राजकीय वक्तव्यांना सोशल मीडियावर विनोद, उपरोध आणि प्रतिउत्तराच्या माध्यमातून उत्तर देण्याची प्रवृत्ती अधिक तीव्र होत असल्याचे या प्रकरणातून दिसून येत आहे.

**२४ तासांत लाखो फॉलोअर्स**

इन्स्टाग्रामवरील माहितीनुसार हे अकाऊंट ऑगस्ट २०२६ मध्ये सुरू करण्यात आले. अकाऊंटचा युजरनेम यापूर्वी बदलण्यात आल्याचे दिसते. सध्या त्यावर ६२ पोस्ट असून ते सुमारे ३५ अकाऊंट्सना फॉलो करत असल्याचे नमूद आहे. मात्र, हे अकाऊंट नेमके कोण चालवत आहे, याची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या अकाऊंटमागे कोणती राजकीय संघटना किंवा व्यक्ती आहे, याबाबत ठोस निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल.

या अकाऊंटकडून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, आपचे नेते अरविंद केजरीवाल, युट्युबर ध्रुव राठी, विनोदी कलाकार कुणाल कामरा, अभिनेते प्रकाश राज आणि फॅक्ट-चेकर मोहम्मद झुबेर यांच्यासह काही प्रमुख सोशल मीडिया अकाऊंट्सना फॉलो केले जात असल्याचे दिसते.

**पंतप्रधानांच्या वक्तव्याला डिजिटल उत्तर?**

स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात मोदी यांनी माओवादाविरोधातील कारवाईचा उल्लेख करताना सशस्त्र नक्षलवादाविरोधातील लढाईत यश मिळाल्याचे सांगितले. मात्र, 'दिमागी नक्षल' अजूनही सक्रिय असल्याचे त्यांनी नमूद केले. यानंतर या शब्दप्रयोगावर राजकीय वर्तुळात आणि सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू झाली.

केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी पंतप्रधानांनी विरोधी पक्षनेत्यांना थेट 'दिमागी नक्षल' म्हटले नसल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या मते, माओवादाचे समर्थन करणारे, संविधानाचा अनादर करणारे, फुटीरतावादाला पाठिंबा देणारे किंवा देशाच्या अखंडतेविरोधातील भूमिका घेणारे लोक या संज्ञेत येतात.

मात्र, सोशल मीडियावरील 'दिमागी नक्षल पार्टी'चा उदय हा या राजकीय भाषेवर आलेला उपरोधिक डिजिटल पलटवार म्हणून पाहिला जात आहे.

**भाषणातून ट्रेंड, ट्रेंडमधून प्रतिआव्हान**

लोकशाहीत सत्ताधाऱ्यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक आहे. परंतु आज राजकीय संवादाचा मोठा भाग सोशल मीडिया मीम्स, टोमणे आणि नव्या राजकीय लेबल्सभोवती फिरताना दिसतो. एखादा शब्द पंतप्रधानांच्या भाषणातून राष्ट्रीय चर्चेत येतो आणि काही तासांतच त्याच शब्दाभोवती डिजिटल समुदाय उभा राहतो, ही बदलत्या राजकीय संवादाची नवी वस्तुस्थिती आहे.

'दिमागी नक्षल पार्टी' हे अधिकृत राजकीय पक्ष आहे की सोशल मीडिया उपक्रम, याबाबत स्पष्टता नसली तरी २४ तासांत लाखो फॉलोअर्स मिळाल्याचा दावा सत्ताधाऱ्यांच्या राजकीय शब्दप्रयोगाला सोशल मीडिया कसा आरसा दाखवतो, याचे उदाहरण ठरले आहे. आता प्रश्न एवढाच'दिमागी नक्षल' हा शब्द राजकीय विरोधकांना नामोहरम करण्याचे हत्यार ठरणार, की त्याच शब्दाचा सोशल मीडिया पलटवार पंतप्रधानांनाच राजकीय भाषेच्या उष्णतेची जाणीव करून देणार?

## संपादकीय

### नारी शक्तीच्या फुलोऱ्याआड मतदारसंघ पुनर्रचनेचा डाव?

महिलांना संसदेत ३३ टक्के आरक्षण देणे हा नक्कीच ऐतिहासिक निर्णय आहे. महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढले पाहिजे, याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. पण लोकशाहीत एखाद्या निर्णयाच्या नावाला टाळ्या वाजवताना त्याच्या परिणामांचा हिशेब मागायचा नसतो, असे कोणत्या संविधानात लिहिले आहे? 'नारी शक्ती'च्या घोषणेने वातावरण भारावून टाकायचे आणि त्याच वेळी देशाच्या राजकीय नकाशाची पुनर्रचना करणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेचा मुद्दा त्याच प्रक्रियेत पुढे न्यायचा, ही कल्पना साधी आहे की राजकीयदृष्ट्या फारच हुशार?

याच प्रश्नाचे उत्तर शोधताना २०२३ पासूनचा घटनाक्रम पाहावा लागतो. १९ सप्टेंबर २०२३ रोजी महिला आरक्षणाचे विधेयक लोकसभेत आणले गेले. पुढे ते १०६वा घटनादुरुस्ती कायदा बनले. या कायद्यानुसार लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांसाठी सुमारे एक-तृतीयांश जागा राखीव करण्याची तरतूद झाली. मात्र त्याची अंमलबजावणी नवीन जनगणनेनंतरच्या मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडण्यात आली. म्हणजेच नारी शक्तीचा झेंडा उभारला गेला, पण त्या झेंड्याच्या दोरीला मतदारसंघ पुनर्रचनेची गाठ आधीपासूनच बांधलेली होती.

ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण मतदारसंघ पुनर्रचना म्हणजे फक्त मतदारसंघांच्या सीमारेषा इकडून तिकडे करण्याचे सरकारी चित्र नाही. कोणत्या राज्याला लोकसभेत किती जागा मिळणार, कोणत्या प्रदेशाचे संसदेत वजन किती राहणार आणि पुढील अनेक वर्षांच्या राष्ट्रीय राजकारणात कोणाचा प्रभाव वाढणार हे ठरवणारी ती प्रक्रिया आहे. त्यामुळे महिलांच्या आरक्षणाइतकीच, किंबहुना त्यापेक्षा व्यापक राजकीय परिणाम करणारी प्रक्रिया म्हणजे मतदारसंघ पुनर्रचना. भारताने १९७१ च्या जनगणनेनंतर लोकसभेतील राज्यनिहाय जागांचे पुनर्वाटप दीर्घकाळ गोठवले. त्यामागे एक साधा पण महत्त्वाचा विचार होताज्या राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात ठेवली, त्यांना त्याची राजकीय शिक्षा मिळू नये. पण आता २०२६ नंतरचा काळ त्या जुन्या समीकरणाला हादरा देणारा ठरू शकतो. लोकसंख्येच्या आधारावर जागांचे पुनर्वाटप झाले तर दक्षिण भारतातील राज्यांसमोर आपल्या राजकीय प्रतिनिधित्वाचे काय होणार, हा प्रश्न उभा राहतो. आणि मग २०२६ मध्ये सरकारकडून पुढे आलेला प्रस्ताव. १६ एप्रिल २०२६ रोजी लोकसभेत संविधान दुरुस्ती विधेयक, मतदारसंघ पुनर्रचना विधेयक आणि केंद्रशासित प्रदेशांशी संबंधित विधेयक अशी त्रिसूत्री मांडण्यात आली. प्रस्तावित आराखड्यात लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागा वाढवून ८१६ करण्याचा विचार होता. सरकारच्या मांडणीनुसार दक्षिण भारतातील जागा १२९ वरून १९५ होऊ शकतात. कर्नाटक २८ वरून ४२, आंध्र प्रदेश २५ वरून ३८, तेलंगण १७ वरून २६, तमिळनाडू ३९ वरून ५९ आणि केरळ २० वरून ३०असे आकडे चर्चेत आले. आता या आकड्यांकडे फक्त गणित म्हणून पाहायचे की राजकारण म्हणून? ५४३ सदस्यांच्या लोकसभेचे गणित बदलून ८१६ झाले, तर संसदेत सत्ता-संतुलन बदलणार नाही असे समजणे म्हणजे राजकारणाला केवळ अंकगणित समजण्याची फार मोठी चूक ठरेल. जागा वाढतात, तेव्हा फक्त खुर्च्या वाढत नाहीत; राजकीय वजन वाढते किंवा कमी होते. सरकार म्हणतेदक्षिण भारतावर अन्याय होणार नाही. अतिशय स्वागतार्ह आश्वासन! पण लोकशाहीत आश्वासनापेक्षा सूत्र महत्त्वाचे असते. कारण मतदारसंघ पुनर्रचनेचा खरा प्रश्न असा आहे की अंतिम नकाशा कोणत्या लोकसंख्येच्या आधारावर तयार होणार आणि त्यातून प्रत्येक राज्याच्या प्रतिनिधित्वाचा टक्का किती बदलणार? याच ठिकाणी 'नारी शक्ती'चा राजकीय वापर अधिकच मनोरंजक वाटतो. महिलांना आरक्षण देण्यास कोण विरोध करणार? महिलांच्या प्रतिनिधित्वाला विरोध केला की विरोधकावर लगेच 'महिलाविरोधी' ठरवण्याची राजकीय सोय उपलब्ध होते. त्यामुळे एका बाजूला ३३ टक्के महिला आरक्षणाचा भावनिक आणि नैतिक मुद्दा, तर दुसऱ्या बाजूला त्याच प्रक्रियेशी जोडलेले मतदारसंघ पुनर्रचनेचे कठीण आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील गणित. वा! राजकारणाला यापेक्षा सुंदर आवरण आणखी काय हवे? पण येथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. मतदारसंघ पुनर्रचना स्वतःमध्ये बेकायदेशीर किंवा अनावश्यक उपक्रम नाही. उलट लोकसंख्येतील बदलानुसार प्रतिनिधित्वाचा पुनर्विचार करणे ही घटनात्मक प्रक्रिया आहे. तसेच महिलांना संसदेत ३३ टक्के प्रतिनिधित्व मिळणे हीदेखील स्वागतार्ह बाब आहे. त्यामुळे प्रश्न महिलांच्या आरक्षणाला विरोध करण्याचा नाही. प्रश्न आहेया दोन वेगळ्या स्वरूपाच्या मुद्द्यांना एकमेकांशी अशा प्रकारे जोडण्यामागची राजकीय वेळ आणि पद्धत काय आहे? कारण २०२६ मध्ये देश २०२७ च्या जनगणनेच्या तयारीत आहे. घरांची यादी आणि घरगणनेचा टप्पा एप्रिल ते सप्टेंबर २०२६ दरम्यान, तर लोकसंख्या मोजणी फेब्रुवारी २०२७ मध्ये होणार आहे. या जनगणनेसाठी केंद्राने ११,७१८.२४ कोटी रुपये खर्च मंजूर केला आहे आणि सुमारे ३० लाख कर्मचारी या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. म्हणजे देशाची नवीन लोकसंख्या मोजण्यासाठी एवढी मोठी यंत्रणा उभी केली जात असताना, मतदारसंघ पुनर्रचनेसाठी जुन्या आकडेवारीचा आधार घेण्याचा प्रस्ताव का? हा प्रश्न विचारला तर लगेच प्रश्न विचारणारा विकासविरोधी किंवा महिलाविरोधी ठरतो का? जनगणना वेगळी आणि मतदारसंघ पुनर्रचना वेगळी असू शकते; पण लोकशाहीतील पारदर्शकता मात्र वेगळी नसावी. आणखी गंमत म्हणजे १७ एप्रिल २०२६ रोजी संविधान दुरुस्ती विधेयकाला आवश्यक विशेष बहुमत मिळाले नाही. मतदानात २९८ सदस्यांनी समर्थन केले, तर २३० सदस्यांनी विरोध केला. म्हणजे 'सर्वमान्य' वाटणाऱ्या या प्रस्तावालाही संसदेत राजकीय संघर्षाचा सामना करावा लागला. महिलांचे प्रतिनिधित्व हा सर्वमान्य आदर्श असला, तरी त्याच्या नावाखाली होणाऱ्या व्यापक राजकीय पुनर्रचनेवर मतभेद असू शकतात, हे या मतदानाने दाखवून दिले. दक्षिण भारतातील चिंता तर आता उघडपणे समोर आली आहे. १२ ऑगस्ट २०२६ रोजी तमिळनाडू विधानसभेने लोकसभेतील ५४३ जागांची संख्या कायम ठेवण्याची मागणी करणारा ठराव मंजूर केला. दक्षिण भारतातील राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे त्यांना भविष्यात राजकीय प्रतिनिधित्वाची किंमत मोजावी लागू नये, हा त्यामागचा मूलभूत आक्षेप आहे.

म्हणजे चित्र असे आहेएकीकडे 'नारी शक्ती', दुसरीकडे 'राष्ट्रीय प्रतिनिधित्व', तिसरीकडे 'मतदारसंघ पुनर्रचना', चौथीकडे 'जनगणना' आणि पाचवीकडे राज्यांच्या राजकीय वजनाचा प्रश्न. आणि या सगळ्याच्या मध्यभागी आहे २०२९ ची लोकसभा निवडणूक.

योगायोगांची मालिका आहे असे मानायला हरकत नाही. पण पत्रकारितेचे आणि लोकशाहीचे काम योगायोगांवर टाळ्या वाजवणे नाही; प्रश्न विचारणे आहे.

जर उद्देश केवळ महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा असेल, तर मतदारसंघ पुनर्रचनेची अंमलबजावणी कोणत्या पद्धतीने होणार, हे पूर्णपणे पारदर्शक का करू नये? प्रत्येक राज्याला किती जागा मिळतील, कोणत्या सूत्राने मिळतील, लोकसंख्या नियंत्रणाचा विचार कसा केला जाईल, दक्षिण भारताचा प्रतिनिधित्वातील वाटा किती राहीलहे सर्व आधीच स्पष्ट का करू नये?

कारण 'नारी शक्ती'ला कोणीही विरोध करणार नाही; पण 'नारी शक्ती'च्या पोस्टरच्या मागे जर भारताच्या राजकीय शक्तीचे पुनर्वाटप होत असेल, तर त्या पोस्टरच्या मागे डोकावणे हे लोकशाहीचे कर्तव्य आहे.

आज खरी भीती महिलांच्या आरक्षणाची नाही. खरी चिंता आहे राजकीय नकाशा बदलण्याची आणि तो बदल कोणत्या सूत्राने होणार याची.

'नारी शक्ती'चे नाव मोठे आहे, घोषणा सुंदर आहे आणि उद्देश ऐकायला उदात्त आहे. पण लोकशाहीत घोषणेपेक्षा अक्षरांमधील तरतूद आणि आकड्यांमधील राजकारण अधिक महत्त्वाचे असते.

म्हणूनच सरकारने एक साधे काम करावेनारी शक्तीचा जयघोष करावा, पण त्याच वेळी मतदारसंघ पुनर्रचनेचे संपूर्ण गणित जनतेसमोर ठेवावे. किती जागा, कोणत्या राज्याला, कोणत्या सूत्राने आणि कोणत्या परिणामासह?

कारण शेवटी प्रश्न असा नाही की 'नारी शक्ती की मतदारसंघ पुनर्रचना?'

प्रश्न असा आहे

नारी शक्तीच्या नावाने मतदारसंघ पुनर्रचनेचा राजकीय खेळ तर खेळला जात नाही ना?

आणि जर खेळ नसेल, तर खेळासारखे दिसणारे हे संपूर्ण गणित जनतेपासून लपवण्याची गरज तरी काय?

# पिंपरी-चिंचवडमध्ये रिक्षा फिडर सेवेचा शुभारंभ; 'घरापासून मेट्रोपर्यंत' प्रवास होणार सुलभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

मेट्रो प्रवाशांचा पुढील प्रवास अधिक सुलभ, किफायतशीर आणि विश्वासार्ह करण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरात रिक्षा फिडर सेवेचा शुभारंभ करण्यात आला. महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते या सेवेचे उद्घाटन झाले. पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महामेट्रो आणि महाराष्ट्र रिक्षा पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या सेवेमुळे नागरिकांना 'घरापासून मेट्रोपर्यंत' आणि 'मेट्रोपासून घरापर्यंत' नियमित व किफायतशीर रिक्षा सेवा उपलब्ध होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात सुमारे २० मार्ग निश्चित करण्यात आले असून, मेट्रो स्थानकांवर मार्ग, रिक्षा थांबे आणि भाड्याची माहिती देणारे दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहेत.

उद्घाटनप्रसंगी महापौर रवि लांडगे म्हणाले, मेट्रो आणि रिक्षा सेवा एकमेकांना जोडल्यामुळे नागरिकांचा वेळ वाचेल. पार्किंगची समस्या कमी होऊन मेट्रोचा वापर वाढण्यास मदत होईल. रिक्षाचालकांनी प्रवाशांचे भाडे नाकारू नये, मीटरप्रमाणे सेवा द्यावी आणि शेअरिंग पद्धतीचा स्वीकार करावा.

**तीन गेटवरून विविध भागांना सेवा**

रिक्षा फिडर सेवा शेअरिंग तसेच मीटर या दोन्ही पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**गेट क्रमांक १** : घरकुल प्रकल्प, जाधववाडी, कुदळवाडी, चिखली गाव, अजमेरा कॉलनी, केएसबी चौक, मोरवाडी कोर्ट, शाहूनगर.

**गेट क्रमांक २** : अंथिया सोसायटी, अजमेरा कॉलनी, मासुळकर कॉलनी, अंतरिक्ष कॉलनी, खराळवाडी, मोनिका अपार्टमेंट, डी. वाय. पाटील कॉलेज.

**गेट क्रमांक ३** : पिंपरी गाव, चिंचवडगाव, तापकीर नगर, वाल्हेकरवाडी, निगडी, डीलक्स चौक, काळेवाडी ब्रिज, साई चौक, चाफेकर चौक.

**'नो रिफ्युजल' धोरण लागू**

मेट्रो स्थानकांवर प्रवाशांना रिक्षा सेवा नाकारता येणार नाही. महाराष्ट्र रिक्षा पंचायतीचे अध्यक्ष बाबा कांबळे यांनी सांगितले की, प्रवाशांना सेवा नाकारणाऱ्या रिक्षाचालकांवर कायदेशीर तसेच संघटनेच्या पातळीवर कारवाई करण्यात येईल.

प्रवाशाने मीटरने जाण्याची मागणी केल्यास रिक्षाचालकाने मीटरप्रमाणे सेवा देणे आवश्यक आहे. तसेच प्रवाशाने इच्छित स्थळी जाण्याची मागणी केल्यास भाडे नाकारता येणार नाही. त्यामुळे मेट्रोमधून उतरल्यानंतर प्रवाशांना पुढील प्रवासासाठी रिक्षा सहज उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.




महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. श्रावण हर्डीकर म्हणाले की, मेट्रो सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी स्थानकापासून पुढील प्रवासाची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. प्रवाशांना सहज रिक्षा मिळाल्यास मेट्रो आणि रिक्षा या दोन्ही सार्वजनिक वाहतूक सेवांवरील विश्वास वाढेल. रिक्षाचालकांनी मीटरप्रमाणे किंवा निश्चित दराने सेवा देण्याबरोबरच शेअरिंग पद्धतीचा स्वीकार करावा, असे त्यांनी आवाहन केले.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले की, मेट्रो स्थानकापासून नागरिकांना इच्छित स्थळी जाण्यासाठी विश्वासार्ह वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाल्यास शहरातील इतर भागांमध्येही या सेवेचा विस्तार करण्यात येईल.

यावेळी आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसदस्य शत्रुघ्न काटे, तुषार हिंगे, शहर अभियंता मनोज सेठीया, महामेट्रोचे व्यवस्थापक कॅप्टन सनेर पाटील, महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे अध्यक्ष बाबा कांबळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह रिक्षाचालक, प्रवासी संघटनांचे प्रतिनिधी आणि विविध पदाधिकारी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत रिक्षा स्थानकांवर भविष्यात ई-चार्जिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही महापौर लांडगे यांनी सांगितले. एकूणच मेट्रो, महापालिका आणि रिक्षा सेवा यांच्यातील समन्वय वाढवून नागरिकांना 'घरापासून मेट्रोपर्यंत' आणि 'मेट्रोपासून घरापर्यंत' सुलभ, किफायतशीर व विश्वासार्ह प्रवासाची सुविधा देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

## इंग्लंडमध्ये भारताच्या फाळणीची बीजे रोवली गेली : डॉ. हेमदेव थापर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

भारताच्या फाळणीची बीजे इंग्लंडमध्ये झालेल्या चर्चांमध्येच रोवली गेली होती, असा दावा डॉ. हेमदेव थापर यांनी केला. पिंपरी येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित 'विभाजन विभीषिका दिन' विशेष सभेत ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

भारतीय इतिहासातील फाळणीचा काळा दिवस म्हणून १४ ऑगस्ट रोजी पिंपरी येथील बी. टी. अडवाणी धर्मशाळेत या विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्नबापू काटे, आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, माजी आमदार अश्विनी जगताप, हर घर तिरंगा अभियानाचे प्रदेश सहसंयोजक अनुप मोरे, जिल्हा संयोजक मोरेश्वर शेडगे, माजी प्राधिकरण अध्यक्ष सदाशिव



खाडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सिंधी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. थापर म्हणाले, १९३० मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या एका परिषदेत भारताला स्वातंत्र्य देताना मुस्लिम समाजासाठी स्वतंत्र देशाची मागणी करण्यात आली. त्यानंतर फाळणीची चर्चा पुढे आली. १९३७ मध्ये मुस्लिम लीगची स्थापना झाली आणि स्वतंत्र देशासाठी 'पाकिस्तान' हे नाव पुढे आणण्यात आले. पुढील काळात राजकीय परिस्थिती अधिक चिघळत गेली आणि अखेर १४ ऑगस्ट १९४७ रोजी भारताची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान हे दोन देश अस्तित्वात आले.

देशाच्या संस्थानांच्या विलीनीकरणाचा उल्लेख करताना डॉ. थापर यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या भूमिकेचे कौतुक केले. स्वातंत्र्यानंतर देशातील संस्थाने भारतात विलीन करण्याची जबाबदारी सरदार पटेल यांच्यावर सोपवण्यात आली होती. त्यांनी मोठ्या संख्येने संस्थाने भारतात विलीन केली. मात्र, काश्मीरच्या प्रश्नावर तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या धोरणावर त्यांनी टीका केली.

काश्मीरला विशेष दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने संविधानातील कलम ३७० रद्द करून या विशेष व्यवस्थेला पूर्णविराम दिला, असे डॉ. थापर यांनी सांगितले.

सभेचे प्रास्ताविक आयोजक ॲड. नानिक पंजाबी यांनी केले. सूत्रसंचालन भाजप संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे यांनी केले, तर सिंधी समाजातील सामाजिक कार्यकर्ते मनोहर जेठवानी यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाच्या आयोजनात ॲड. नानिक पंजाबी, मनोहर जेठवानी, श्रीचंद नागरानी, ज्योतीका मलकानी आणि आतम प्रकाश मताई यांनी भूमिका बजावली. सभेला भाजपचे विविध पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधी, महिला व युवा मोर्चाचे पदाधिकारी तसेच सिंधी समाजातील व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनोज सेठिया यांची शहर अभियंतापदी पदोन्नती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागातील सह शहर अभियंता (स्थापत्य) मनोज मोतीलाल सेठिया यांना सेवाज्येष्ठतेनुसार 'शहर अभियंता' पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी याबाबतचा आदेश जारी केला आहे.

महापालिकेच्या आस्थापनेवरील शहर अभियंता पद २८ फेब्रुवारी २०२६ रोजी रिक्त झाले होते. या पदावरील पदोन्नतीसाठी १८ जून २०२६ रोजी पदोन्नती समितीची बैठक झाली. समितीने शैक्षणिक अर्हता, अनुभव, आरक्षण, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मत्ता व दायित्व तसेच शिस्तभंगविषयक बाबींची पडताळणी करून सेठिया यांच्या पदोन्नतीची शिफारस केली. महापालिका सभेच्या ठराव क्रमांक ४४, दिनांक २७ जानेवारी



२०२६ अन्वयेही त्यांच्या पदोन्नतीस मान्यता देण्यात आली आहे. दरम्यान, ही पदोन्नती संबंधित न्यायालयीन प्रकरणे, पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका, संबंधित शासन निर्णय तसेच मुंबई उच्च न्यायालयातील प्रलंबित रिट याचिकांमधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात आली आहे. शहर अभियंता पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर पिंपरी-चिंचवडमधील विविध विकासकामांना तांत्रिकदृष्ट्या अधिक सक्षम दिशा मिळण्यास तसेच स्थापत्य विभागातील कामकाजात प्रभावी समन्वय साधण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## 'श्राव्यम द आंध्रा किचन'चे आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते झाले उद्घाटन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

आपल्या अस्सल चवींनी खवय्यांची मने जिंकणारे 'श्राव्यम द आंध्रा किचन' हे प्रसिद्ध आंध्रा खाद्यपदार्थांचे रेस्टॉरंट चिखली येथे नव्याने सुरू झालेल्या त्यांच्या दुसऱ्या फ्रंचायझीला लाँचच्या दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शुभप्रसंगी भाजप आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते उद्घाटन झाले त्यावेळी अन्य मान्यवर ही उपस्थित होते

'श्राव्यम द आंध्रा किचन'ला २०२५ मध्ये स्विगी आणि झोमॅटोद्वारे इंदोरमधील पहिल्या क्रमांकाचा बिर्याणी ब्रँड म्हणून सन्मानित करण्यात आले होते, तसेच २०२३ पासून 'पॉप्युलर साऊथ इंडियन ब्रँड ऑफ इंदोर' पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. ब्रँडची विश्वसनीयता आधीच प्रस्थापित झालेली असताना पुण्यातील त्यांच्या दुसऱ्या आऊटलेटच्या लाँचच्या दिवशी खवय्यांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. खमंग चव, दर्जेदार घटक आणि परंपरेत रुजलेला जेवणाचा अनुभव एकत्र आणत श्राव्यम द आंध्रा किचनचे उद्दिष्ट पुणेकरांना आंध्राच्या समृद्ध पाककलेच्या वारशाची अस्सल चव देणे हे आहे.



मेनूमध्ये गुंटूर स्पेशल पोडी इडली, टिपू चायना इडली, कढपा स्पेशल कारम डोसा, म्हैसूर बोन्डा, लेमन राईस, हैदराबादी बिर्याणी आणि डबल का मीठा इत्यादी अत्यंत आवडत्या पदार्थांसह आंध्राचे पारंपारिक मसाले आणि पाककृती वापरून तयार केलेल्या अनेक अस्सल शाकाहारी खाद्यपदार्थांचा समावेश आहे. चिखली वेगाने नवे फूड डेस्टिनेशन म्हणून उदयास येत असताना श्राव्यम द आंध्रा किचन खवय्यांना आपुलकी, अस्सलता आणि आंध्रप्रदेशच्या समृद्ध पाककलेचा मिलाफ असलेला अनुभव देण्याची आशा करते.

उद्घाटनप्रसंगी मत व्यक्त करताना भाजप आमदार महेश लांडगे म्हणाले, ''नवीन व्यवसाय आपल्या खाद्य आणि व्यावसायिक परिसंस्थेच्या वाढीस हातभार लावत त्यांच्या सेवांचा विस्तार करण्यासाठी चिखली आणि पिंपरी-चिंचवडला पहिली पसंती देत आहेत हे पाहणे आनंददायी आहे. पुण्यातील व्यक्तींपर्यंत आंध्राची अस्सल चव पोहोचवत असताना श्राव्यम द आंध्रा किचन आणि त्यांच्या टीमला माझ्याकडून मनापासून शुभेच्छा.''

श्राव्यमचे संस्थापक वेंकट राघवेंद्र राव म्हणाले, ''आम्ही श्राव्यम द आंध्रा किचन सुरू केले, तेव्हा आम्हाला केवळ आणखी एक रेस्टॉरंट उघडायचे नव्हते. आम्हाला लोकांना अस्सल तेलुगू चव, परंपरा आणि संस्कृतीचा अनुभव घेता येईल असे ठिकाण निर्माण करायचे होते. इंदोरने आमचे मनापासून स्वागत केले आणि २०२३ पासून आम्हाला 'पॉप्युलर साऊथ इंडियन ब्रँड ऑफ इंदोर' पुरस्काराने सन्मानित केले, ज्यामुळे आम्हाला तीच ऊर्जा पुण्यात आणण्याचा आत्मविश्वास मिळाला.

## पुनावळे येथे बोगस डॉक्टरवर गुन्हा; आरोपी पोलीस कोठडीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : प्रतिनिधी**

पुनावळे येथील पांढरे वस्ती, श्रीनाथ हॉस्पिटलजवळ वैद्यकीय पदवी नसताना बेकायदेशीररीत्या क्लिनिक चालवून रुग्णांची फसवणूक करणाऱ्या बोगस डॉक्टरवर रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भागवत टेकूराम निषाद (वय ३९ वर्षे, रा. वास्तू इम्पेरीयीर कन्स्ट्रक्शन साईट, रावेत) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदकुमार मोरेंच्या फिर्यादीनुसार, आरोपी कोणतीही वैद्यकीय अर्हता नसताना औषधे, इंजेक्शन देऊन रुग्णांवर बेकायदेशीर उपचार करत होता. या प्रकरणी सपोनि देशमुख पुढील तपास करत आहेत.

**चिखलीत कारमध्ये बसवून तरुणाची लूट; तिघांवर गुन्हा दाखल**

चिखलीतील जाधववाडी येथे मनी ट्रान्सफर करण्यासाठी जाणाऱ्या रंजनकुमार राजभर (वय २५ वर्षे) या तरुणाला तिघांनी कारमध्ये बसवून लुटल्याची धक्कादायक घटना घडली. आरोपी गणेश पांडुरंग क्षीरसागर (वय २७ वर्षे),




सुहास उर्फ डेव्हीड आणि पप्पू यांनी फिर्यादीला गाडीतून थोडे अंतर नेऊन खाली उतरवले आणि मारहाण करत त्यांच्याकडील ओप्पो मोबाईल व रोख २० हजार रुपये असा मुद्देमाल जबरदस्तीने हिसकावून नेला. चिखली पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून सपोनि मोटे पुढील तपास करत आहेत.

**दिघी परिसरातून दुचाकीची चोरी**

दिघी, देहूफाटा येथील आर्य आर्केड समोरील पार्किंगमधून अज्ञात चोरट्याने हिरो एचएफ डिलक्स मोटारसायकल (चक १४ ऋथ २६९४) पळवून नेली. कल्पेश शांताराम महाजन (वय ३० वर्षे) यांनी याबाबत दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून चोरीस गेलेल्या दुचाकीची किंमत सुमारे ३० हजार रुपये आहे. या प्रकरणाचा तपास पोउपनि वरे करत आहेत.

**जुना पुणे-मुंबई महामार्गावर निष्काळजी दुचाकी चालकावर गुन्हा**

तळेगाव दाभाडे परिसरातील जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर, सीआरपीएफ गेट नंबर दोनजवळ निष्काळजीपणे दुचाकी चालवून अपघात केल्याप्रकरणी राहुल सुंदर मुंडे (वय २२ वर्षे, रा. शिक्रापूर) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. आरोपीने दुचाकीने (चक २१ उघ ५७४०) फिर्यादी रियाज मेहमूद शेख यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात फिर्यादी गंभीर जखमी झाले असून पोउपनि खामगळ तपास करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### येरवड्यातील निरीक्षणगृहातील कर्मचाऱ्यावर अल्पवयीनांकडून हल्ला – खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी तीन अल्पवयीनांविरुद्ध गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

येरवड्यातील पं. जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्रातील कर्मचाऱ्यावर अल्पवयीनांनी हल्ला केल्याची घटना घडली. मारहाणीत निरीक्षण गृहातील कर्मचारी गंभीर जखमी झाला. खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी तीन अल्पवयीनांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

संतोष किसन कुंभार (वय ५०, रा. नंदादीप सोसायटी, चऱ्होली फाटा) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी तीन अल्पवयीनांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कुंभार यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येरवड्यातील पं. जवाहराल नेहरु उद्योग केंद्रात (मुलांचे शासकीय निरीक्षणगृह) कुंभार हे कर्मचारी आहेत. रविवारी (१६ ऑगस्ट) सकाळी साडेदहाच्या सुमारास ते निरीक्षणगृहातील अल्पवयीनांना नाश्ता वाटत होते. त्या वेळी किरकोळ वादातून निरीक्षणगृहातील तीन अल्पवयीनांनी कुंभार यांना मारहाण केली. मारहाणीत त्यांना गंभीर दुखापत झाली. या घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस आयुक्त सुनील जैतापूरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांनी घटनास्थळी धाव घेतली.

# पहिल्याच श्रावणी सोमवारी भीमाशंकरला भाविकांची प्रचंड गर्दी

## ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने दुमदुमले श्रीक्षेत्र; प्रशासनाचा चोख बंदोबस्त





■ दैनिक राज्य लोकतंत्र

जुन्नर । प्रतिनिधी

भीमाशंकर : श्रावण महिन्यातील पहिल्याच सोमवारी बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे भगवान शिवाच्या दर्शनासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली. ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने संपूर्ण भीमाशंकर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. शनिवार, १५ ऑगस्ट आणि रविवारची सुट्टी यामुळे यंदा भाविक तसेच पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली होती.

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन देवस्थान ट्रस्ट, जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाच्या वतीने सुरक्षेच्या दृष्टीने सुनियोजित व्यवस्था करण्यात आली होती. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस कर्मचारी व होमगार्ड तैनात करण्यात आले होते. याशिवाय एक पोलीस उपअधीक्षक, एक पोलीस निरीक्षक, चार सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि २० पोलीस उपनिरीक्षकांसह विशेष नियंत्रण कक्ष कार्यरत ठेवण्यात आला होता.

**पहाटेपासून दर्शनासाठी रांगा**

भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने रांगेतून दर्शन घेतले. पहाटे पाच वाजल्यापासूनच मंदिरात दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. दूरदूरवरून आलेल्या भाविकांनी ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन मनोभावे पूजा-अर्चा केली.

ज्योतिर्लिंगाच्या दर्शनाबरोबरच भीमा नदीचे उगमस्थान, श्री कमलजा माता मंदिर, हनुमान तळे तसेच श्रीक्षेत्र गुप्त भीमाशंकर येथेही भाविकांनी मोठी गर्दी केली. भीमाशंकर देवस्थानचे विश्वस्त श्री. रत्नाकर कोडीलकर यांनी ही माहिती दिली.

**गैरवर्तन करणाऱ्या पर्यटकांवर कारवाई**

भाविकांसोबत मोठ्या संख्येने पर्यटकही भीमाशंकर परिसरात दाखल झाले होते. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात आली. पर्यटकांनी नियमांचे पालन करावे,

तसेच गैरवर्तन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा घोडेगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पवार यांनी दिला होता.

**पाऊस, धुके अन् धबधब्यांचा निसर्गरम्य अनुभव**

भीमाशंकर परिसरात सध्या पावसाळ्यामुळे निसर्गाने हिरवाईची चादर पांघरली आहे. सततचा पाऊस, दाट धुके, सदाहरित जंगल, छोटे-मोठे धबधबे आणि आल्हाददायक वातावरण यामुळे भाविकांसोबत आलेल्या पर्यटकांनीही निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद घेतला.

दरम्यान, सततचा पाऊस आणि बदलते हवामान लक्षात घेता भाविक व पर्यटकांनी पर्यटनस्थळी विशेष काळजी घ्यावी, धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन आंबेगाव-जुन्नरच्या उपविभागीय अधिकारी अर्चना तांबे यांनी केले.

# आरोपींना तात्काळ अटक करा; धनराज पिसाळ आत्महत्या प्रकरणी बारामतीत ग्रामस्थांचा ‘रास्ता रोको’

■ दैनिक राज्य लोकतंत्र

बारामती : प्रतिनिधी

प्रॉपर्टीचा वाद आणि कोट्यवधी रुपयांच्या फसवणुकीतून धनराज जयवंत पिसाळ यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या प्रकरणाला आता नवे वळण लागले आहे. गुन्हा दाखल होऊन ४० दिवस उलटले तरी मुख्य आरोपींना अटक न झाल्याने संतप्त ग्रामस्थांनी मोरगाव-बारामती महामार्गावरील फोंडवाडा पाटी येथे तीव्र ‘रास्ता रोको’ आंदोलन केले. या आंदोलनामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.४० दिवस उलटूनही कारवाई नाही; ग्रामस्थ आक्रमकमिळालेल्या माहितीनुसार, धनराज पिसाळ आत्महत्या प्रकरणात बारामती दूध उत्पादक संघाचे संचालक सतीश हरिश्चंद्र पिसाळ यांच्यासह इतर काही नातेवाईकांवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मात्र, इतके दिवस होऊनही पोलिसांनी आरोपींवर कोणतीही ठोस अटक कारवाई केली नसल्याचा गंभीर आरोप आंदोलक ग्रामस्थांनी केला आहे. आरोपींना तात्काळ गजाआड करावे, या मागणीसाठी माळवाडी, फोंडवाडा, कान्हाटी आणि जळगाव परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते.पीडित कुटुंबाला सुरक्षेची मागणीया आंदोलनादरम्यान ग्रामस्थांनी केवळ आरोपींच्या अटकेचीच नव्हे, तर मृत धनराज पिसाळ यांच्या कुटुंबाच्या सुरक्षेचा प्रश्नही उपस्थित केला. संबंधित कुटुंबाला शासकीय संरक्षण देण्यात यावे, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. तसेच, पोलीस प्रशासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी (ऋळअॅ खर्पीर्शीीळसरींळेप) करून दोषींना कडक कायदेशीर शासनाचे निर्देश द्यावेत, असे आवाहन आंदोलनकर्त्यांनी केले. वाहतुकीचा खोळंबाफोंडवाडा पाटी येथे अचानक शेकडो ग्रामस्थ एकत्र आल्याने मोरगाव-बारामती मार्गावर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आंदोलनाची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली.

# भाजीपाला बाजारभाव कोसळले; शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही मिळेना!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

शेतीमालाच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने भाजीपाला उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. धना, मेथी, टोमॅटो, शेपू यांसह विविध भाजीपाला पिकांचे दर सध्या मोठ्या प्रमाणात कोसळले असून अनेक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही भरून निघत नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

वाळूंजनगर येथील प्रगतिशील शेतकरी महेंद्र वाळुंज यांनी सांगितले की, भाजीपाला पिकवण्यासाठी लागणारा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि वाहतूक यांचा खर्च वाढला असताना बाजारात मात्र शेतीमालाला अपेक्षित दर मिळत नाही. त्यामुळे उत्पादन खर्च वजा केल्यानंतर शेतकऱ्यांच्या हातात अत्यल्प रक्कम शिल्लक राहत असून मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

वाढत्या महागाईमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित आणखी बिघडले आहे. खते, कीटकनाशके तसेच बी-बियाण्यांच्या किमती सातत्याने वाढत आहेत. उत्पादन खर्च वाढत असताना शेतीमालाचे बाजारभाव घसरत असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. एकीकडे महागडी शेती आणि दुसरीकडे कवडीमोल दर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

युवा प्रगतिशील शेतकरी जयेश वाळुंज यांनी सांगितले की, शेतीचा वाढता खर्च आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. भाजीपाला उत्पादकांना योग्य बाजारभाव मिळण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतमालाला किफायतशीर दर मिळावा, यासाठी बाजारव्यवस्थेत सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

मांदळेवाडी येथील प्रगतिशील शेतकरी संभाजी आदक यांनीही बाजारभावाच्या घसरणीवर नाराजी व्यक्त केली. रात्रंदिवस कष्ट करून शेतात उत्पादन घ्यायचे आणि त्याच उत्पादनाला बाजारात योग्य भाव मिळणार नसेल, तर शेतकऱ्यांनी जगायचे कसे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. भाजीपाला पिकांच्या दरातील सततची घसरण ही केवळ शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा प्रश्न नसून संपूर्ण कृषी अर्थव्यवस्थेसमोरील गंभीर आव्हान बनले आहे. त्यामुळे शासनाने बाजारभाव स्थिर ठेवण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, शेतमालाच्या विक्रीसाठी सक्षम बाजारव्यवस्था निर्माण करावी आणि उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतकऱ्यांना किफायतशीर दर मिळतील, यासाठी तातडीने निर्णय घ्यावेत, अशी मागणी भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे.

# विकासाच्या नावाखाली जल-जंगल-जमिनीची लूट;

## ग्रामपंचायतींचे अधिकार कागदावर, संसाधनांचे रक्षण मात्र वाऱ्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । विशेष वृत्त

‘विकास’ हा शब्द आज इतका व्यापक झाला आहे की त्याच्या नावाखाली नेमके काय वाचवायचे आणि काय गमवायचे, याचा हिशेबच हरवला आहे. रस्ते, उद्योग, धरणे, खाणी, शहरांचा विस्तार आणि विविध प्रकल्पांच्या नावाखाली ग्रामीण भारतातील जल, जमीन आणि जंगल या नैसर्गिक संपत्तीवर वाढता दबाव निर्माण होत असताना त्यांचे खरे पालक असलेल्या ग्रामपंचायती मात्र अनेकदा अधिकार असूनही साधनविहीन ठरत आहेत. कायदे विकेंद्रीकरणाची भाषा करतात; प्रत्यक्षात निर्णयप्रक्रिया अजूनही मोठ्या प्रमाणावर वरच्या पातळीवरच केंद्रीत असल्याचे चित्र आहे.

भारतीय संविधानातील ७३व्या घटनादुरुस्तीने पंचायतराज संस्थांना बळ देत स्थानिक पातळीवरील विकास आणि संसाधन व्यवस्थापनासाठी व्यापक चौकट निर्माण केली. अकराव्या अनुसूचीतील २९ विषयांमध्ये जलव्यवस्थापन, सामाजिक वनीकरण, लघु वनोपज यांसारख्या विषयांचा समावेश करण्यात आला. मात्र, अधिकारांचे हस्तांतरण आणि त्या अधिकारांसाठी आवश्यक निधी, कर्मचारी व तांत्रिक क्षमता उपलब्ध करून देणे यात मोठी तफावत राहिली आहे.

अनुसूचित क्षेत्रांसाठीचा पेसा कायदा, १९९६ आणि वन हक्क कायदा, २००६ यांनी ग्रामसभा व स्थानिक समुदायांच्या भूमिकेला आणखी महत्त्व दिले. सामुदायिक वनसंपत्तीचे संरक्षण, व्यवस्थापन आणि स्थानिक उपजीविकेशी संबंधित निर्णयांमध्ये ग्रामसभेला स्थान देण्यात आले. पण प्रश्न असा आहे की हे अधिकार प्रत्यक्षात किती ग्रामसभांच्या हातात आहेत?

**कायद्यांत अधिकार, जमिनीवर मात्र संघर्ष**

गावातील तलाव, विहिरी, पारंपरिक पाणवठे, गायरान जमीन, सार्वजनिक मोकळी जमीन आणि सामुदायिक जंगल ही केवळ सरकारी नोंदवहीतील मालमत्ता नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार आहेत. चारा, सरपण, पाणी, लघु वनोपज आणि स्थानिक रोजगारासाठी लाखो कुटुंबे या संसाधनांवर अवलंबून आहेत.

मात्र, विकास प्रकल्पांच्या नावाखाली जमीन हस्तांतरण, अतिक्रमण, अनियंत्रित वाळू उपसा, खाणकाम, जंगलतोड आणि जलस्रोतांवरील वाढता दबाव यामुळे सामुदायिक संसाधने झपाट्याने कमी होत आहेत. सार्वजनिक गायरानावर अतिक्रमण झाले, तलाव बुजवला गेला किंवा जंगलाचा ऱ्हास झाला तर त्याचा फटका सर्वाधिक गरीब आणि भूमिहीन कुटुंबांना बसतो.

**‘विकास’ कोणासाठी आणि किंमत कोणाची?**

विकास प्रकल्पांना विरोध करणे हा मुद्दा नाही; विकासाचा लाभ कोणाला आणि त्याची पर्यावरणीय व सामाजिक किंमत कोण चुकवणार, हा मूलभूत प्रश्न आहे. एखादा प्रकल्प उभा राहतो, रोजगाराची आश्वासने दिली जातात; मात्र त्यासाठी पाण्याचे स्रोत आटले, शेतीची जमीन गेली, जंगल नष्ट झाले किंवा स्थानिक उपजीविका उद्ध्वस्त झाली, तर त्या नुकसानीची भरपाई केवळ पैशांत होऊ शकते का?

ग्रामसभेची परवानगी, स्थानिक सहभाग आणि सामुदायिक हक्क यांना केवळ प्रशासकीय औपचारिकता मानले गेले तर विकेंद्रीकरणाचा संपूर्ण उद्देशच निष्फळ ठरतो.

**ग्रामपंचायतींना अधिकार नव्हे, अधिकार वापरण्याची ताकद हवी**

आज अनेक ग्रामपंचायतींकडे नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनासाठी स्वतंत्र निधी नाही. पर्यावरणीय प्रकल्पांसाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ अपुरे आहे. वन विभाग, महसूल विभाग, खाण विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यातील अधिकारक्षेत्राचे वाद अनेकदा निर्णयप्रक्रियेला गुंतागुंतीचे बनवतात.

त्यामुळे केवळ कायदे करून प्रश्न सुटणार नाही. ग्रामसभेला कायदेशीर अधिकार, ग्रामपंचायतीला स्वतंत्र निधी, स्थानिक संस्थांना तांत्रिक क्षमता आणि निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता देणे आवश्यक आहे.

जल, जमीन आणि जंगल ही पुढील पिढ्यांची संपत्ती आहे. त्यांचे रक्षण करणे ही केवळ ग्रामपंचायतीची जबाबदारी नाही, तर सरकारचीही घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे. विकासाच्या नावाखाली जर गावांचे पाणी, शेतकऱ्यांची जमीन आणि जंगलांची हिरवाईच संपवली जात असेल, तर तो विकास नसून संसाधनांचे हस्तांतरण ठरते. आज प्रश्न ग्रामपंचायतींच्या अधिकारांचा नाही; प्रश्न आहेसरकार खरोखर हे अधिकार गावांच्या हातात देणार आहे का, की ‘विकास’च्या नावाखाली जल-जंगल-जमिनीवरील लोकांचा हक्क कागदावरच ठेवणार आहे?

# तब्बल २६ वर्षांनी पुन्हा एकदा भरला वर्ग; माजी विद्यार्थ्यांचा सस्नेह मेळावा उत्साहात संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी



देवगाव (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता सातवीच्या माजी विद्यार्थ्यांचा सस्नेह मेळावा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. तब्बल २६ वर्षांनंतर माजी विद्यार्थी पुन्हा एकदा आपल्या जुन्या शाळेत एकत्र आले आणि बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळाला.

ज्या वर्गखोलीत बालपणीचे अनेक सुंदर क्षण अनुभवले, त्याच ठिकाणी माजी विद्यार्थ्यांनी पुन्हा एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. अनेक वर्षांनंतर झालेल्या या भेटीमुळे मित्र-मैत्रिणींमध्ये जुन्या आठवणी, गमती-जमती आणि अनुभवांची मनमोकळी देवाणघेवाण झाली.

या सस्नेह मेळाव्यास तत्कालीन गुरुजनांची विशेष उपस्थिती लाभली. सुदाम घोडे, रापाटील गुरुजी, तुकाराम ताथवडे, किसन गुरुजी, जयराम थोरात गुरुजी, कोडिंका जोरी, कमल जोरी आदी गुरुजन उपस्थित होते.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. बालपणी शिक्षणासोबत संस्कार आणि जीवनमूल्यांची शिकवण देणाऱ्या गुरुजनांविषयी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. गुरुजनांनीही माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधत जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमादरम्यान जुन्या मित्र-मैत्रिणींच्या भेटीगाठी, आठवणींची देवाणघेवाण आणि हास्य-विनोदामुळे वातावरण भावूक तसेच आनंदमय झाले. काळाच्या ओघात प्रत्येकाच्या आयुष्याच्या वाटा बदलल्या असल्या तरी शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील जिव्हाळ्याचे नाते आजही कायम असल्याचे या मेळाव्यातून प्रकर्षाने दिसून आले.

काळ पुढे गेला, आयुष्याच्या वाटा बदलल्या; मात्र शाळेच्या आठवणी आणि गुरुजनांबद्दलचा आदर आजही मनात तितकाच जिवंत आहे, अशी भावना उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

तब्बल २६ वर्षांनंतर पुन्हा एकदा भरलेला हा वर्ग केवळ स्नेहमेळावा न ठरता जुन्या आठवणी, गुरुजनांचे आशीर्वाद आणि मैत्रीच्या अतूट नात्याचा अविस्मरणीय सोहळा ठरला.

# पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना केंद्रीय गृह मंत्रालयाचे ‘अतिउत्कृष्ट सेवा पदक’

■ दैनिक राज्य लोकतंत्र

■ पुणे : प्रतिनिधी

उल्लेखनीय आणि कर्तव्यदक्ष सेवेसाठी पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना केंद्रीय गृह मंत्रालयाकडून मानाचे ‘अतिउत्कृष्ट सेवा पदक’ जाहीर झाले आहे. या गौरवाबद्दल पुणे शहरातील विविध क्षेत्रांतील लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने अमितेश कुमार यांचा पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.



यावेळी उत्कृष्ट सेवेबद्दल सहपोलीस आयुक्त संजय दराडे यांचाही शिष्टमंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. पुणे पोलीस आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर अमितेश कुमार यांनी शहरातील गुन्हेगारी नियंत्रण, अवैध धंद्यांवर कठोर कारवाई आणि सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण यावर विशेष भर दिला आहे. त्यांच्या गतिमान कार्यपद्धतीमुळे पुणे शहरातील कायदा-सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्यास मदत झाल्याचे मत सत्कारप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या वेळी पुणे शहराचे माजी नगरसेवक अय्युब शेख, माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, शिवसेना नेते अजय भोसले, शिक्षण मंडळाचे माजी सदस्य बाळासाहेब जानराव, रिपब्लिकन सोशालिस्ट पक्षाचे राहुल डंबाळे, शिवसेनेचे मिलिंद आहिरे, सामाजिक कार्यकर्ते आबिद सय्यद यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सह्याद्री वाचवा’चा एल्गार; १,५०० मेगावॉट जलविद्युत प्रकल्पाविरोधात आदिवासी ग्रामस्थ आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

जुन्नर : प्रतिनिधी

तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील ऐतिहासिक नाणेघाट आणि माळशेज घाट परिसरात प्रस्तावित १,५०० मेगावॉट क्षमतेच्या पंप्ड स्टोरेज जलविद्युत प्रकल्पाविरोधात स्थानिक आदिवासी बांधव आणि ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम होण्याची भीती व्यक्त करत आंदोलकांनी आता संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला असून ‘सह्याद्री वाचवा संघर्ष समिती’ची स्थापना करण्यात आली आहे.

अंजनावळे आणि भोरांडे परिसरात प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पाला स्थानिक पेसा ग्रामसभांनी शंभर टक्के विरोध दर्शवल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. ग्रामसभांच्या संमतीला डावलून प्रशासनाकडून सर्वेक्षण आणि अन्य प्रक्रिया सुरू असल्याचा आरोप करत ही प्रक्रिया तातडीने थांबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पाची जनसुनावणी रद्द करावी, या मागणीसाठी मढ येथे नुकतेच अनोखे आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी शेळ्या आणि गाढवांसह अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर रास्ता रोको करत प्रशासनाचे लक्ष वेधले. या आंदोलनातून प्रकल्पाविरोधातील स्थानिकांचा संताप स्पष्ट झाला.

आंदोलकांच्या मते, सह्याद्रीच्या संवेदनशील पर्यावरणीय क्षेत्रावर प्रकल्पाचा गंभीर परिणाम होऊ शकतो. जीवधन किल्ला, घाटघर परिसर तसेच अभयारण्यातील राखीव वनसंपदा यांना संभाव्य धोका निर्माण होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. जलस्रोत, जंगल, जैवविविधता आणि स्थानिकांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे.

**पेसा ग्रामसभांच्या अधिकारांचा मुद्दा ऐरणीवर**

अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना विशेष अधिकार देणाऱ्या पेसा कायद्याचा दाखला देत आंदोलकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ग्रामसभांच्या अधिकारांना डावलून प्रकल्पासंदर्भातील प्रशासकीय प्रक्रिया पुढे नेणे थांबवावे, अशी मागणी संघर्ष समितीने केली आहे.

दरम्यान, २१ ऑगस्ट रोजी प्रस्तावित जनसुनावणी होणार आहे. ती रद्द होणार की प्रशासन जनसुनावणी पुढे नेणार, याकडे जुन्नर तालुक्यासह पश्चिम आदिवासी भागाचे लक्ष लागले आहे.

## सारांश वृत्त

### पुणे-कोल्हापूर रेल्वे प्रवाशांसाठी खूशखबर! विशेष दर्जा हटल्याने तिकीट दर घटणार;

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

पुणे-कोल्हापूर दरम्यान धावणाऱ्या रेल्वेचा विशेष दर्जा काढला जाणार असून ही रेल्वे आता नियमित होणार आहे. विशेष दर्जा असल्याने या रेल्वेचे तिकीट एक्स्प्रेसच्या तुलनेत जास्त होते. आता तिकीट दरात बदल होऊन ते मेल-एक्स्प्रेस एवढे होणार आहे. तिकीट तुलनेने कमी झाल्याने प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. रेल्वे प्रशासनाने २० ऑक्टोबरपासून ही गाडी नव्या क्रमांकासह दररोज धावण्याला मंजुरी दिली आहे. यामुळे सातारा, सांगली आणि कोल्हापूरच्या प्रवाशांची सोय होणार आहे. पूर्वी या रेल्वेचा क्रमांक (०१०२३/२४) होता, आता तो (११४१९/२०) असा असणार आहे. गाडी क्रमांक ११४१९ ही रेल्वे पुण्याहून रात्री नऊ वाजून ४० मिनिटांनी सुटेल, कोल्हापूरला दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजून आठ मिनिटांनी पोहोचेल. गाडी क्रमांक ११४२० कोल्हापूर येथून रात्री नऊ वाजून ५० मिनिटांनी सुटेल, पुण्याला दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजून १० मिनिटांनी पोहोचेल. ही रेल्वे दररोज धावणार आहे.

या गाडीला सासवड रोड, जेजुरी, निरा, लोणंद, वठार, सातारा, कोरेगाव, रहिमतपूर, तारगाव, मसूर, कराड, ताकारी, किर्लोस्करवाडी, भिलवडी, सांगली, मिरज, जयसिंगपूर, हातकणंगले, रुकडी आणि वळवडे आदी स्थानकावर थांबा देण्यात आला आहे. या गाडीला एक वातानुकूलित द्वितीय, चार वातानुकूलित तृतीय, सात शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी, एक द्वितीय आसनासह असे डबे जोडण्यात आले आहे.

# ‘मी राजगृहातील रमाई बोलतेय’ हा केवळ प्रयोग नव्हे, तर वैचारिक प्रबोधन : प्रा. दिलीप महालिंगे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी : ‘मी राजगृहातील रमाई बोलतेय’ हा केवळ नाट्यप्रयोग नसून समाजमनाला विचार करायला लावणारे वैचारिक प्रबोधन आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नाट्यकर्मी प्रा. दिलीप महालिंगे यांनी केले.

रमाई फाऊंडेशन, रमाई मासिक, रमाई प्रकाशन आणि लोकनेते भय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त तसेच भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ‘मी राजगृहातील रमाई बोलतेय’ हा एकपात्री प्रयोग आणि ‘तरी आम्ही बोलू नये’ हा वैचारिक काव्यमय कार्यक्रम सादर करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. दिलीप महालिंगे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी ख्यातनाम साहित्यिक व विचारवंत प्राचार्य डॉ. संजय मून होते. रमाई फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा रमाई मासिकाच्या संपादक प्रा. डॉ. रेखा मेश्राम यांनी प्रास्ताविक केले.

पुणे येथील प्रा. रमणी



बबिता आकाश यांनी ‘मी राजगृहातील रमाई बोलतेय’ या एकपात्री प्रयोगातून रमाईंच्या जीवनसंघर्षाचा आणि सामाजिक योगदानाचा प्रभावी आविष्कार सादर केला. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

‘तरी आम्ही बोलू नये’ या वैचारिक काव्यमय कार्यक्रमात प्रा. रमणी बबिता आकाश, श्रेया वाघ, अनिशा दोडके, जित्या जाली, किरण प्रकाश, स्वराज समदूर, विजय लोखंडे, प्रशिक तायडे, किशोर चक्रनारायण, सुमेध वंदना मधुकर, सुभाष गवळी आणि शुभम आव्हाळे यांनी आपल्या कवितांच्या माध्यमातून सामाजिक वास्तवावर भाष्य करत समाजमन जागृत केले.

कार्यक्रमास प्रा. विजयकुमार गवई, ॲड. एस. आर. बोडदे, प्राचार्य सुनील वाकेकर, प्राचार्य डॉ. यशवंत खडसे, डॉ. धनराज गोंडाणे, स. सो. खंडाळकर, रतनकुमार साळवे, ॲड. जे. के. नारायणे आणि व्ही. के. वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दैवतीला गवंदे, राजकन्या गोंडाणे, डॉ. वंदना पाटील, शारदा पगारे, रत्नकला बनसोडे, संघमित्रा खंडाळकर, सविता अभ्यंकर, सरला सदावर्ते आणि गंगाबाई सुरडकर यांनी परिश्रम घेतले.

## समुद्रातील स्फोटक धोक्यांना भारत-अमेरिकेचा संयुक्त ‘डिफ्यूज’! कोचीमध्ये नौदलांचा शक्तिप्रदर्शनासह सराव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

हिंद-प्रशांत क्षेत्रातील वाढत्या सुरक्षेच्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर भारत आणि अमेरिकेच्या नौदलांनी सागरी सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण संयुक्त सराव पूर्ण केला आहे. भारत-अमेरिका नौदलाचा आठवा स्फोटक आयुध निकामीकरण सराव-२०२६ १४ ऑगस्ट रोजी कोची येथील दक्षिण नौदल कमांडमध्ये पार पडला.

या सरावात दोन्ही देशांच्या नौदलांनी स्फोटकांचा शोध, त्यांना सुरक्षित पद्धतीने निकामी करणे आणि सागरी भागातील स्फोटक धोक्यांना तोंड देण्याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण व अनुभवांची देवाणघेवाण केली. विशेष म्हणजे, आधुनिक युद्धपद्धतीत वाढत असलेल्या सुधारित स्फोटक उपकरणांच्या म्हणजेच आयईडीच्या धोक्यांवरही विशेष चर्चा करण्यात आली.

भारतीय नौदलाच्या माहितीनुसार, तज्ज्ञांच्या चर्चांमध्ये आयईडीपासून निर्माण होणारे प्रत्यक्ष धोके, स्फोटके सुरक्षित करण्याच्या प्रक्रिया, समुद्रातील सुरुंग निष्क्रिय करणे आणि मानवरहित पाण्याखालील यंत्रणांचा वापर या महत्त्वाच्या विषयांचा समावेश होता.

सरावादरम्यान भारतीय नौदलाच्या विशेष कमांडोने स्फोटक शोध घेणाऱ्या प्रशिक्षित श्वानासह हेलिकॉप्टरमधून दोरीच्या साहाय्याने खाली उतरत केलेल्या प्रात्यक्षिकानेही सर्वांचे लक्ष वेधले. या संयुक्त सरावाचा उद्देश केवळ प्रशिक्षणापुरता मर्यादित नसून, भविष्यातील सागरी सुरक्षेच्या संभाव्य धोक्यांना दोन्ही नौदलांनी एकत्रितपणे सामोरे जाण्याची क्षमता वाढवणे हा आहे. मानवरहित पाण्याखालील यंत्रणा, सागरी सुरुंग आणि सुधारित स्फोटक उपकरणांचा वापर वाढत असताना अशा प्रकारचे सहकार्य अधिक महत्त्वाचे ठरत आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील संरक्षण सहकार्य गेल्या काही वर्षांत सातत्याने विस्तारत आहे.

## राहुल गांधींना दिलासा की उच्च न्यायालयाच्या आदेशावरच सर्वोच्च न्यायालयाचा सवाल?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या कथित बेहिशेबी मालमत्ता प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या पुढील कार्यवाहीला तातडीने स्थगिती दिली. त्यामुळे या प्रकरणाला आता केवळ राजकीय नव्हे, तर न्यायालयीन प्रक्रियेच्या मर्यादांचाही गंभीर प्रश्न जोडला गेला आहे.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सुनावणीदरम्यान सीबीआयच्या वतीने उपस्थित अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांना न्यायालयीन प्रक्रियेतील नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांची आठवण करून दिली. चौकशी किंवा तपासाचे निर्देश द्यायचे असतील, तर न्यायालयांनी नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करणे अपेक्षित आहे, असे मुख्य न्यायाधीशांनी स्पष्ट केले.

या एका निरीक्षणानेच या प्रकरणाचे गांभीर्य अधोरेखित होते. कारण प्रश्न केवळ राहुल गांधींच्या कथित मालमत्तेचा नाही; प्रश्न असा आहे की एखाद्या व्यक्तीविरुद्ध चौकशीचे निर्देश देताना त्याला आपली बाजू मांडण्याची पुरेशी संधी देण्यात आली होती का?

राहुल गांधींनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे त्यांच्या नागरी हक्कांवर आणि राजकीय प्रतिष्ठेवर थेट परिणाम झाल्याचा दावा केला होता. आता सर्वोच्च न्यायालयाने कार्यवाहीला स्थगिती दिल्याने उच्च न्यायालयाच्या प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मात्र याचा अर्थ राहुल गांधी निर्दोष ठरले, असा अजिबात नाही. सर्वोच्च न्यायालयाने आरोप फेटाळलेले नाहीत; त्याने प्रक्रिया आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांची कसोटी लावली आहे.

राजकारणात आरोपांची तलवार चालवणे सोपे असते; पण न्यायालयात आरोप सिद्ध करण्यासाठी प्रक्रिया पाळावीच लागते. त्यामुळे या प्रकरणात आता खरी परीक्षा राहुल गांधींचीच नाही, तर न्यायव्यवस्थेच्या प्रक्रियात्मक निष्पक्षतेचीही आहे.

## जगज्जेत्या शि यूचीला भारतीय आयुष शेट्टीचा धक्का! विश्वविजेतेपदाच्या पहिल्याच फेरीत नंबर-१ खेळाडू गारद

■ दैनिक राज्य लोकतंत्र


नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भारतीय बॅडमिंटनच्या इतिहासात सोमवारी, १७ ऑगस्ट २०२६ रोजी एका युवा खेळाडूने मोठा धक्का दिला. दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या बीएफडब्ल्यू विश्व अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या २१ वर्षीय आयुष शेट्टीने जगातील क्रमांक-१ आणि विद्यमान विश्वविजेता चीनच्या शि यूचीचा पराभव करून स्पर्धेत खळबळ उडवून दिली.

विश्व अजिंक्यपद स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या शेट्टीने पहिल्याच फेरीत अव्वल मानांकित आणि गतविजेत्या शि यूचीला २१-१४, १३-२१, २१-१९ अशा तीन गेममध्ये पराभूत केले. हा विजय केवळ एका सामन्याचा निकाल नाही; भारतीय बॅडमिंटनमध्ये नव्या पिढीच्या आत्मविश्वासाची मोठी घोषणा आहे.

पहिल्या गेममध्ये शेट्टीने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. विशेषतः नेटजवळील त्याच्या वेगवान खेळापुढे शि यूचीला अपेक्षित नियंत्रण मिळवता आले नाही. शेट्टीने पहिला गेम २१-१४ असा जिंकत सामन्यात आघाडी घेतली.

मात्र जगातील नंबर-१ खेळाडू सहज हार मानणार नव्हता. दुसऱ्या गेममध्ये शि यूचीने आपला अनुभव



आणि वेग वापरत जोरदार पुनरागमन केले आणि २१-१३ असा गेम जिंकत सामना निर्णायक तिसऱ्या गेममध्ये नेला.

खरी परीक्षा तिथे सुरू झाली. निर्णायक गेममध्ये आयुष शेट्टीने तब्बल ११-५ अशी आघाडी घेतली. मात्र शि यूचीने अखेरच्या टप्प्यात जोरदार प्रतिकार करत सामना पुन्हा रंगतदार केला. दबाव वाढत असतानाही शेट्टीने संयम सोडला नाही आणि २१-१९ असा निर्णायक गेम जिंकत ऐतिहासिक विजयावर शिक्कामोर्तब केले.

विशेष म्हणजे, शेट्टीचा हा विश्व अजिंक्यपद स्पर्धेतील पहिलाच सामना होता. पण समोर जगातील नंबर-१ खेळाडू असतानाही त्याने दबावाला बळी न पडता केलेला खेळ भारतीय बॅडमिंटनसाठी मोठा संकेत आहे.

शि यूचीसाठी हा अनपेक्षित धक्का आहे; तर आयुष शेट्टीसाठी हा विजय कारकिर्दीला नवी दिशा देणारा ठरू शकतो.

विश्वविजेत्याला हरवून शेट्टीने केवळ दुसऱ्या फेरीत प्रवेश केला नाहीत्याने जगाला सांगितले आहे की भारतीय बॅडमिंटनची पुढची मोठी ताकद कोर्टवर तयार आहे!

## रशिया-युक्रेन युद्धाचा भारताच्या स्वयंपाकघरावर परिणाम! सोयातेल आयात विक्रमी पातळीवर; सणासुदीच्या मागणीने बाजार तापला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

रशिया-युक्रेन युद्धाचा परिणाम आता केवळ आंतरराष्ट्रीय राजकारण आणि ऊर्जा बाजारापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर भारताच्या खाद्यतेल बाजारावरही त्याची छाया पडताना दिसत आहे. सणासुदीच्या काळातील वाढती मागणी आणि सूर्यफूल तेलाच्या पुरवठ्यात निर्माण झालेल्या अडचणींमुळे भारताची सोयातेल आयात ऑगस्ट २०२६ मध्ये विक्रमी पातळीवर पोहोचण्याची शक्यता आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, ऑगस्टमध्ये भारत सुमारे ६ लाख २० हजार मेट्रिक टन सोयातेलाची आयात करू शकतो. विशेष म्हणजे, नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झालेल्या चालू विपणन वर्षात भारताची सरासरी मासिक सोयातेल आयात ४ लाख २४ हजार ५४९ टन राहिली आहे. म्हणजेच ऑगस्टमधील संभाव्य आयात सरासरीपेक्षा तब्बल ४६ टक्क्यांनी अधिक असू शकते.

यामागे दोन प्रमुख कारणे दिसत आहेत. पहिले म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारात सोयातेलाचे तुलनेने स्पर्धात्मक दर. त्यामुळे भारतातील तेलशुद्धीकरण कंपन्यांनी आयात वाढवण्यास सुरुवात केली आहे. दुसरे आणि अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे रशिया-युक्रेन युद्धामुळे सूर्यफूल तेलाच्या पुरवठा साखळीवर निर्माण झालेले व्यत्यय.

भारतामध्ये सणासुदीच्या काळात खाद्यतेलाची मागणी वाढते. त्यामुळे तेलशुद्धीकरण कंपन्या आधीच मोठ्या प्रमाणावर खरेदी करत आहेत. सूर्यफूल तेलाच्या उपलब्धतेवर दबाव निर्माण झाल्याने ग्राहकांची आणि उद्योगाची गरज भागवण्यासाठी सोयातेलाकडे पर्याय म्हणून पाहिले जात आहे.

याचा भारतातील ग्राहकांवर नेमका परिणाम काय होणार, हा मात्र महत्त्वाचा प्रश्न आहे. आयात वाढल्याने पुरवठा सुधारू शकतो आणि किंमतींवर नियंत्रण ठेवण्यास मदत होऊ शकते. पण आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थिती आणि जागतिक तेलबाजारातील अस्थिरता कायम राहिल्यास खाद्यतेलाच्या किमती पुन्हा वाढण्याचा धोका कायम आहे.

म्हणजेच युद्ध रणांगणावर सुरू असले, तरी त्याची झळ भारतीय स्वयंपाकघरापर्यंत पोहोचत आहेआणि आता सोयातेलाची विक्रमी आयात त्याचाच नवा पुरावा ठरत आहे.

## राममंदिर देणगी गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण करा : न्यायालय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

अयोध्येतील राममंदिरातील देणग्यांच्या कथित गैरव्यवहाराची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाला तपास जलदगतीने पूर्ण करून तो तार्किक निष्कर्षापर्यंत नेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिले.

सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायाधीश जॉयमाल्या बागची आणि न्यायाधीश व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने एसआयटीला तपासातील प्रगतीचा स्थिती अहवाल सीलबंद लिफाफ्यात सादर करण्यास सांगितले. तसेच, या प्रकरणातील विविध पक्षकारांनी तपास अधिक प्रभावी आणि पारदर्शक करण्यासाठी दिलेल्या सूचनांचा वस्तुनिष्ठपणे विचार करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले. एसआयटीचा अहवाल तपासल्यानंतर भाविकांकडून राम मंदिरात दिल्या जाणाऱ्या देणग्यांच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी आवश्यक निर्देश देण्याचा विचार न्यायालय करणार असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले. यापूर्वी २७ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयाने कथित देणगी गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी आयजीपी किरण एस. यांच्या नेतृत्वाखाली चार सदस्यीय एसआयटी स्थापन केल्याची दखल घेतली होती.

# अणुदुर्घटना झाली तर पीडितांना ‘कॅप’ की न्यायालयाला मोकळे हात? ‘शांती’ कायद्यावर सर्वोच्च न्यायालयाचा गंभीर सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

अणुऊर्जा क्षेत्रात खासगी गुंतवणुकीचा मार्ग खुला करणाऱ्या ‘सस्टेनेबल हार्नेसिंग अँड ॲडव्हान्समेंट ऑफ न्यूक्लियर एनर्जी फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया’ अर्थात ‘शांती’ कायदा, २०२५ यातील भरपाईच्या तरतुदींवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी, १७ ऑगस्ट २०२६ रोजी केंद्र सरकारसमोर अत्यंत महत्त्वाचा घटनात्मक प्रश्न उपस्थित केला. अणुऊर्जा प्रकल्पात दुर्घटना घडल्यास कायद्याने ठरवलेल्या भरपाईच्या कमाल मर्यादा घटनात्मक न्यायालयाला पीडितांसाठी ‘योग्य’ भरपाई देण्यापासून रोखू शकतात का, असा थेट सवाल न्यायालयाने केला.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने केंद्र सरकार आणि अणुऊर्जा नियामक मंडळाला नोटीस बजावली आहे. याचिकेत ‘शांती’ कायद्यातील अणुदुर्घटनांबाबतची ऑपरेटर, पुरवठादार आणि उत्पादकांच्या दायित्वाची मर्यादा ठरवणाऱ्या तरतुदींना आव्हान देण्यात आले आहे.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी सुनावणीदरम्यान अत्यंत मूलभूत प्रश्न उपस्थित केला.कायद्याने झालेल्या चुकीसाठी घटनात्मक न्यायालयाने योग्य भरपाई देण्यास काय प्रतिबंध आहे? म्हणजेच संसदेनं भरपाईची कमाल मर्यादा ठरवली असली, तरी एखाद्या अणुदुर्घटनेत मानवी जीवितहानी किंवा व्यापक नुकसान झाल्यास न्यायालयाला त्यापेक्षा अधिक भरपाई देण्याचा घटनात्मक अधिकार आहे का, हा मुद्दा आता केंद्रस्थानी आला आहे.

‘शांती’ कायद्याला राष्ट्रपतींची मंजुरी २१ डिसेंबर २०२५ रोजी मिळाली. या कायद्याचा एक महत्त्वाचा उद्देश भारताच्या अणुऊर्जा क्षेत्रात खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवणे हा आहे. सरकारच्या मते, कायदा अणुऊर्जा विस्तारासाठी आवश्यक असलेली गुंतवणूक आकर्षित करतानाच सुरक्षा आणि भरपाईची व्यवस्था कायम ठेवतो.

मात्र वादाचा केंद्रबिंदू आहे तो भरपाईचा ‘कॅप’.

कायद्यानुसार प्रत्येक अणुदुर्घटनेसाठी एकूण दायित्वाची कमाल मर्यादा ३० कोटी विशेष आहरण हक्क म्हणजेच एसडीआर इतकी किंवा केंद्र सरकारने अधिसूचनेद्वारे ठरवलेली त्याहून अधिक रक्कम आहे. दुसरीकडे, अणुऊर्जा प्रकल्पाच्या क्षमतेनुसार ऑपरेटरचे दायित्व १०० कोटी रुपयांपासून ३,००० कोटी रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आले आहे. सर्वात मोठ्या, ३,६०० मेगावॅटपेक्षा अधिक औष्णिक क्षमतेच्या अणुभट्ट्यांसाठी ही मर्यादा ३,००० कोटी रुपये आहे.

यापेक्षा अधिक नुकसान झाल्यास काही परिस्थितींमध्ये केंद्र सरकारची जबाबदारी लागू होते. सरकारने ‘न्यूक्लियर लायबिलिटी फंड’ उभारण्याचीही तरतूद केली आहे. तसेच ३० कोटी एसडीआरपेक्षा अधिक भरपाईची गरज भासल्यास आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा आधार घेण्याची तरतूद कायद्यात आहे.

पण सर्वोच्च न्यायालयाचा प्रश्न याच ठिकाणी अधिक गंभीर ठरतो. कायद्याने मर्यादा आखली म्हणून मानवी दुःखालाही मर्यादा घालता येईल का?

अणुदुर्घटना म्हणजे केवळ मालमत्तेचे नुकसान नाही. जीवितहानी, आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम, पर्यावरणीय हानी, उपजीविकेचे नुकसान आणि पुढील पिढ्यांवर होणारे परिणाम यांची किंमत पैशांत मोजणेच कठीण आहे. त्यामुळे कायद्यातील निश्चित मर्यादा आणि न्यायालयाच्या घटनात्मक अधिकारांमध्ये संघर्ष निर्माण झाल्यास कोणाला प्राधान्य मिळणार, हा प्रश्न आता सर्वोच्च न्यायालयासमोर आहे.

विशेष म्हणजे, मे २०२६ मध्येही याच खटल्याच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने अणुदायित्वाची मर्यादा हा अत्यंत संवेदनशील विधायी धोरणाचा विषय असल्याचे म्हटले होते. त्याच वेळी दुर्घटनेत नुकसान झाल्यास पीडितांसाठी पुरेशी भरपाईची सक्षम व्यवस्था आहे का, अशी चिंता न्यायालयाने व्यक्त केली होती. सरकारसाठी हा केवळ अणुऊर्जा विस्ताराचा प्रश्न नाही; खासगी कंपन्यांना या क्षेत्रात आणताना गुंतवणूकदारांचे संरक्षण आणि नागरिकांचे अधिकार यांच्यात संतुलन साधण्याची कसोटी आहे.